# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

## मान्यताप्राप्त युनियन

बंधू-भगिनींनो,

गेल्या काही वर्षांपासून कामगारांच्या प्रलंबीत असलेल्या मागण्यांसंदर्भात मॅनेजमेंट काहीच ठोस निर्णय घेत नसल्याने ओएनजीसीतील सर्व कर्मचाऱ्यांमध्ये तसेच सर्व मान्यताप्राप्त युनियन्समध्ये प्रचंड प्रमाणात असंतोष होता. अशा परिस्थितीत सर्व मान्यताप्राप्त युनियन्स ज्या सवलतींची मागणी करीत होत्या त्या मागण्या कामगारांना मिळण्यास अडथळा निर्माण व्हावा या उद्देशाने अलिकडे मॅनेजमेंटने एकापाठोपाठ एक अशा ऑर्डर्स काढण्यास सुरुवात केली होती. कामगारांमध्ये अगोदरच असंतोष धुमसत असताना मॅनेजमेंटने घेतलेल्या आडमुठ्या धोरणाचा निषेध करुन मॅनेजमेंटच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा निर्णय सर्व मान्यताप्राप्त युनियन्सनी एकमताने घेतला व या निर्णयाप्रमाणे मुंबईसह सर्व राज्यांत निदर्शने, घोषणा, हंगरस्ट्राईक तसेच सर्व रिग्जवर 'वर्क टू रुल' आंदोलन सुरु करण्यात आले. या आंदोलनामुळे ओएनजीसीत अस्थीरता निर्माण झाली. सर्व रिग्जवर 'वर्क टू रुल' आंदोलनामुळे कामकाज जवळजवळ ठप्प झाले. या आंदोलानाचा मॅनेजमेंटवर दबाव आल्यामुळे मॅनेजमेंट कामगारांच्या मागण्यांबाबत त्वरीत चर्चा करण्यास तयार झाली व एक आठवड्याच्या आतच देहराडून येथे मॅनेजमेंटने सभेचे आयोजन केले. सदर सभेत दिवसभराची चर्चा होवूनदेखील कोणताच निर्णय न झाल्यामुळे आठ दिवसात मॅनेजमेंटने पुन्हा दुसरी मिटींग आयोजित केली. या मिटींगमध्ये देखिल अगदी शेवटच्या घटकेपर्यंत मॅनेजमेंट आपला हट्ट सोडत नसल्यामुळे सर्व मान्यताप्राप्त युनियनच्या नेत्यानी सदर मिटींगवर बहिष्कार टाकून डायरेक्टर (एचआर) यांच्या केबिनच्या बाहेर जमिनीवर बसून घेराव केला. सर्व युनियनच्या नेत्यांनी मॅनेजमेंटला ठामपणे बजावले कि, "आपल्याला शक्य असेल त्या बळाचा वापर आमच्यावर करा, परंतू कामगारांच्या रास्त मागण्यांवर जोवर आपण समाधानकारक तोडगा काढीत नाही तोपर्यंत आम्ही येथून हलणार नाही." ओएनजीसीच्या इतिहासात प्रथमच अशा प्रकारे सर्व मान्यताप्राप्त युनियनच्या नेत्यांनी अशी टोकाची आक्रमक भुमिका घेतल्यामुळे डायरेक्टर (एच आर) यांनी तातडीने मा. चेअरमन साहेबांना परिस्थितीचे गांभिर्य कळवून खालिलप्रमाणे निर्णय जाहिर केले.

1. लॅप टॅप / डाटा कार्ड क्लास III-IV कर्मचाऱ्यांना मंजूर
2. एअर फॅसिलिटी एस -II व त्यावरील श्रेणीं साठी मंजूर
3. सीएमआरई w-7 श्रेणी साठी मंजूर
4. MOU 2004 बाबत एक महिन्याचा अवधी मागून घेतला
5. टॉपमन भरतीसाठी एक महिन्याच्या अवधी मागून घेतला

वरील घटनाक्रम आज सर्वांसमोर असताना पीईयू ची नेतेमंडळी कामगारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. या पीईयू च्या नेत्यांचा असा दावा आहे कि, वरील मागण्यांसदर्भात आम्ही अंकलेश्वरच्या भाजपाप्रणीत BMS च्या युनियनच्या नेत्याला पाठिंबा देणारे पत्रक दिलेले असून, या नेत्याने कामगारांच्या मागण्यांचे निवेदन पेट्रोलियम मिनीस्टरना दिलेले असल्यामुळेच कामगारांना या सवलती जाहिर झालेल्या आहेत. ओएनजीसीतील कामगारांनी कॉंग्रेसशी संलग्न असलेल्या ज्या पीइयू च्या नेत्यांचा दारुण पराभव केलेला आहे अशा पराभूत झालेल्या नेत्यांच्या पाठिंब्याच्या पत्राची दखल भाजपाचे मा. मंत्री कितपत घेतील हे

कोणाला वेगळे सांगण्याची गरज नाही. आज प्रत्येक कामगाराला माहित आहे कि, ज्या सवलती कामगारांना जाहिर झालेल्या आहेत त्या सवलतींबाबत किंवा 2004 च्या MOU बाबत पीईयूच्या नेत्यांनी ना गेल्या पाच वर्षात कधी आंदोलने छेडली, ना कधी मॅनेजमेंटशी पत्रव्यवहार केला. आणि कोणत्या तोंडाने करणार ? कारण यांनीच तर MOU वर सह्या केल्यात. असे असतानाही हि पीईयूची नेतेमंडळी निर्लज्जपणे या साऱ्या सवलती आमच्याच नेत्यांच्या प्रयत्नाने मिळाल्या आहेत अशा प्रकारचे मेसेज व पत्रके काढून सर्वांना सांगत सुटलीत. दुसऱ्यांनी प्रामाणिकपणे मेहनत घेवून केलेली कामे अत्यंत चलाखीने स्वत:च्या नावावर खपविण्याची जुनी खोड या पीईयूच्या नेतेमंडळींना असल्याची जुन्या कामगारांना पुर्वीपासूनच माहिती असून वरीलप्रमाणे पीईयूच्या नेत्यांनी केलेला स्टंट हा नविन कामगारांच्याही लक्षात आलेला आहे. आणि म्हणूनच मान्य झालेल्या मागण्यांचे श्रेय लाटण्यासाठी पीईयूच्या नेत्यांनी केलेली पत्रकबाजी व सोशल मिडीयावर टाकलेली मेसेजेस आज सर्व कामगारांमध्ये थट्टेचा विषय झालेला आहे.

.

आज कामगारांना ज्या सवलती जाहिर झाल्या आहेत त्याबद्दल कर्मचारी संघटना समाधानी असून, MOU 2004 मध्ये सुधारणा तसेच TOPMAN या पदांची भरती हे दोन विषय कर्मचारी संघटनेसाठी अत्यंत महत्वाचे आहेत. सदर विषयांसंदर्भात राजमुंद्री येथे 15 जून 2016 रोजी मिटींग होणार आहे. कर्मचारी संघटना या दोन्ही विषयांबाबत योग्य न्याय मिळविण्याबाबत प्रचंड आशावादी असून कामगारांना दिलासा मिळवून देण्यासाठी कटिबध्द आहे.

.

**कर्मचारी संघटना झिंदाबाद ! कामगार एकता झिंदाबाद !!**

(प्रदीप मयेकर)
सरचिटणीस